# ही का कल्पद्रुमाची फळं ?

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**ही का कल्पद्रुमाची फळं ? : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# ही का कल्पद्रुमाची फळं ?

# १

दिवसाचं सारं काम आटोपल्यावर पोस्टमास्तर बाबूराव कामतांनी रोजच्या क्रमाप्रमाणे खुर्चीत व्यवस्थित मांडी घातली, आणि विडी शिलगावून तिचे झुरके घेत समोरच्या खिडकीतून ते बघत राहिले...

त्यांच्या खुर्चीसमोरच्या या खिडकीतून जवळजवळ चार फर्लांगाचा देखावा दिसत होता... किंचित नागमोडी वळणानं गेलेला पुणे-मुंबई रस्ता, त्याच्या दुतर्फाची मोठमोठी झाडं, उजव्या डाव्या अंगांची शेतखाचरं, जिथे रस्ता दिसेनासा झाला होता तिथे झाडांच्या माथ्यांना भिडलेलं आभाळ! खिडकीतून दिसणाऱ्या या दृश्याची रूपं ऋतुमानाप्रमाणे पालटत असत... बाबूराव कामत पोस्टातली नोकरी करीत, परंतु त्यांना लिहिण्यावाचण्याचा छंद होता. काव्यरचनेचा उद्योग त्यांनी अलीकडे सोडून दिला होता. जुन्या काळातल्या मित्रमंडळींची पांगापांग झाली होती, काव्याचा जमानाही पालटला होता. परंतु एकेकाळी बाबुरावांनी कवी म्हणून थोडं फार नाव मिळविलं होतं. 'मनोरंजन' मासिकात त्यांच्या बऱ्याच कविता छापून आल्या होत्या. नोकरीच्या निमित्तानं त्यांचं वास्तव्य पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरी कधी झालं नव्हतं, छोट्या छोट्या गावीच झालं होतं. तथापि त्यांनी मराठी साहित्याचं... आणि विशेषत: मराठी काव्याचं... आपलं वाचन अद्यावत ठेवलं होतं. त्यांच्या टेबलावरदेखील मराठी कादंबऱ्या, कथासंग्रह अशी पुस्तकं आणि मासिकांचे अंक पडलेले असत... ते कवी असल्यामुळे खिडकीतून दिसणाऱ्या देखाव्याची त्या त्या ऋतूतली मनोहर रूपं ते मोठ्या रसिकतेनं टिपून घेत असत... पुणे-मुंबई रस्त्याची

नागमोडी वळणाची स्वच्छ रुंद पट्टी, तिच्या दोन्ही बाजूंचे वृक्ष आणि शेतं, दूर अंतरावरचे डोंगरमाथे, असा हा देखावा डोळ्यांना नेहमीच संतोष देत असे. परंतु ऋतू पालटला की त्याची शोभाही पालटे... या दृश्याच्या विविध रूपांवर बाबुराव कामतांनी एक छाटसं काव्य लिहिलं होतं, आणि नवकाव्याच्या जमान्यातदेखील त्यांच्या या काव्याची प्रशंसा झाली होती. वर्षाकालाच्या प्रारंभी या दृश्याचं जे रूप दिसत असे ते बाबुरावांनी सर्वांत अधिक मनोहर ठरविलं होतं, आपल्या काव्यात त्यांनी त्याचं मोठं बहारदार वर्णन केलं होतं...

या वर्णनात जे निसर्गचित्र त्यांनी रंगविलं होतं तेच त्यांना आत्ता दिसत होतं. कारण मृग नक्षत्राचा पाऊस गेल्या चार दिवसांत जोरानं पडला होता, आणि आता जरी थोडी उघडीप झाली होती तरी ऐन पावसाळ्याचीच हवा पडली होती... दूर क्षितिजापाशी डोंगरमाथ्यांना ओलसर गडद निळा रंग चढला होता. वरच्या बाजूस ढगांच्या लहान मोठ्या वाकड्या तिकड्या आकृती अत्यंत मंद गतीनं सरकत होत्या, त्यांचा काळसर राखी रंग उठून दिसत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या खाचरात पाऊसपाणी साचलं होतं. क्वचित पांढऱ्याशुभ्र अंगाचे बगळे बसलेले दिसत होते. वृष्टीनं न्हाऊन निघालेल्या वृक्षांच्या हिरव्या पर्णराजींना नवतीचा तजेला चढला होता. आणि या सर्व देखाव्यावर मावळतीकडे झुकलेल्या सूर्याची किरणं मेघमालेच्या फटीतून वाट काढून पसरली होती...

बाबूराव कामत एकीकडे हा सुंदर देखावा डोळे भरून बघत होते, आणि दुसरीकडे विडीचे झुरके घेता घेता स्वत:च्या काव्यातले चरण आठवून स्वत:शीच गुणगुणत होते...

''निळ्या तांबड्या पिवळ्या हिरव्या असंख्य रंगांवरी
मावळतीचा सूर्य आपली सुवर्णशोभा धरी''

हे चरण गुणगुणता गुणगुणता बाबूराव कामतांना बाबासाहेब मोहित्यांची आठवण झाली... कारण बाबूरावांनी आपलं काव्य प्रसिद्धीस धाडण्यापूर्वी बाबासाहेबांना वाचून दाखविलं तेव्हा या दोन ओळी त्यांना फारशा आवडल्या नव्हत्या. ते बाबूरावांना म्हणाले होते, ''केवळ प्रास साधण्यासाठी 'शोभा धरी' असं तुम्ही ठोकून दिलंय बाबूराव. खरं म्हणजे सूर्यानं आपली शोभा 'पसरली' आहे असं तुम्हाला म्हणायचं आहे. परंतु 'पसरी' हा चार मात्रांचा शब्द तुमच्या कवितेत फिट



बसत नाही. तुमच्या त्या ओळीत जागा आहे फक्त तीन मात्रांच्या शब्दाला. म्हणून तुम्ही 'धरी'चे पाय धरले आहात. खरं की खाटं सांगा. हा तुमचा पराजय आहे एक प्रकारचा!''... बाबासाहेबांचा हा मुद्दा अगदी बरोबर होता. बाबूरावांनी कवितेत दुरुस्ती केली नव्हती, पण त्यांना चुटपुट लागून राहिली होती ती ही की, या दोन ओळी आपल्याला सफाईनं साधलेल्या नाहीत...

असले काही किरकोळ दोष बाबासाहेबांनी जरी दाखविले होते तरी त्यांना बाबूरावांची कविता एकंदरीत पसंत पडली होती, आणि तिच्याबद्दल त्यांनी बाबुरावांचं अभिनंदनही केलं होतं... बाबुरावांचा काव्यरचनेचा उद्योग आता मंदावलेला होता. मराठी साहित्यात नवकाव्याची लाट आलेली होती. बाबूरावांच्या समकालीन कवींपैकी कुणी मृत्युवश झाले होते, कुणी हयात होते परंतु कविता करीनासे झाले होते. मित्रमंडळींच्या बैठकी व गाठीभेटी आता पूर्वीसारख्या होईनाशा झाल्या होत्या. प्रसिद्धीसाठी कविता पाठविण्याची बाबूरावांची पूर्वीची हौस आता मावळली होती. तथापि त्यांचं जन्मसिद्ध कवित्व त्यांना स्वस्थ बसू देत नसे. स्वत:च्या आनंदासाठी कविता करण्याची लहर त्यांना पुष्कळदा येत असे. मग पोस्ट खात्याच्या मळकट पिवळ्या सरकारी कागदाच्या पाठीवर सुचतील त्या काव्यपंक्ती ते लिहून काढीत असत. आणि संध्याकाळी कचेरीचं काम संपलं की बाबासाहेब मोहित्यांकडे धाव घेत असत. काही लिहून झालं की ते बाबासाहेबांना दाखवावं, त्यांचा अभिप्राय घ्यावा असं त्यांना वाटत असे...

पुणे-मुंबई रस्त्यावरच्या लहानशा गावी बाबूरावांना साहित्यिक संगती खरं म्हणजे मिळण्यासारखी नव्हतीच. परंतु या गावी बदली झाली तेव्हा बाबूरावांना विशेष आनंद झाला होता. कारण त्यांना आधीच माहीत झालं होतं की बाबासाहेब मोहिते या छोट्याशा गावी स्थायिक झालेले आहेत. या गावी नोकरीनिमित्त आपण गेलो तर बाबासाहेबांचा सहवास आपल्याला पुष्कळ लाभेल. कणकवलीला आल्याबरोबर त्यांनी त्यांचा परिचय करून घेतला होता, कणकवलीला आल्याबरोबर त्यांनी त्यांचा परिचय करून घेतला होता, आणि त्यांचा स्नेह व लोभ संपादिला होता. एखादी कविता लिहिली तर तिच्या निमित्तानंच तेवढे बाबूराव बाबासाहेबांच्या घरी जात असत असं नव्हे. एरव्हीही पुष्कळ जात असत. स्वत:च्या लेखनासंबंधी मोठ्या हौसेने आणि आवेशानं बोलणारे पुष्कळ साहित्यिक असतात. त्यापैकी बाबासाहेब नव्हते.

परंतु सामान्य साहित्यिक चर्चा ते मोठ्या रुचीनं आणि उल्हासानं करीत. वृत्तपत्रातल्या शिळ्या ताज्या बातम्यांवरून साहित्यिक आणि राजकीय घडामोडींचेही विषय त्यांच्या बोलण्यात निघत. बाबासाहेबांना स्वत:च्या ग्रंथांबद्दल किंवा संकल्पित लेखनाबद्दल कसं बोलायला हवं. यांच्या युक्त्याही बाबूरावांना आता माहीत झाल्या होत्या. संध्याकाळची मनमोकळ्या गप्पांची बैठक म्हणजे दोघांचाही एक आवडता कार्यक्रम होऊन बसला होता...

आतादेखील खिडकीतून दिसणाऱ्या देखाव्याकडे बघता बघता आणि स्वत:ची कविता गुणगुणता गुणगुणता बाबूरावांना जेव्हा बाबासाहेबांची आठवण झाली तेव्हा ते स्वत:शी म्हणाले, आता थोड्या वेळानं उठावं आणि बाबासाहेबांच्या बंगल्यावर जावं...

बाबासाहेब मोहित्यांचा 'पर्णकुटी' बंगाल कणकवली गावापासून दूर एकांतात होता. चार-पाच हजारांच्या वस्तीचं हे कणकवली गाव टेकडीच्या पायथ्याशी पसरल्यासारखं वसलेलं होतं. पुणे-मुंबईचा मोटाररस्ता गावाच्या बरोबर मध्यावरून गेलेला होता, व त्यामुळे गावाचे दोन भाग झाले होते. आजूबाजूच्या प्रदेशात त्यांची शेती होती अशांचीच वस्ती या गावात मुख्यत: होती. या मूळच्या वस्तीत भर पडली होती सावकारी करणाऱ्या मारवाड्यांची, दुकानदारांची, गावातल्या तंट्याबखेड्यावर जगणाऱ्या चार वकिलांची, कज्जेदलालांची, आणि शाळामास्तर पोस्टमास्तर अशा लोकांची ...कोणत्याही लहान गावी चालू असावेत असे नित्याचे व्यवहार या गावात चालू असत. परंतु एकंदरीत हे गाव आळसटल्यासारखं, झोपल्यासारखं भासत असे...

गावाच्या बरोबर मधून गेलेला पुणे-मुंबई हमरस्ता मात्र सतत जागा असे. मालवाहतूक करणाऱ्या मोठमोठ्या अवजड ट्रक्स आणि टूरिंग गाड्या या रस्त्यानं केवळ दिवसाच नव्हे तर रात्री अपरात्री पहाटेदेखील धावत असत. हा रस्ता म्हणजे गावाची बाजारपेठ होती. या बाजारपेठेत कापडाचोपडाची, स्टेशनरीची, काचसामानाची, किराणा भुसार मालाची दुकानं तर होतीच, परंतु शिवाय चहाची आणि सोडावॉटरची दुकानंही मोटार वाहतुकीमुळे निर्माण झाली होती. यातल्या एका दुकानदारानं आइस्क्रीमचा धंदा सुरू केला, तो चांगला चालल्यामुळे आणखीही दोन दुकानावर शुद्धलेखनाचा खून करणाऱ्या ''येथे उत्तम आइस्क्रीम मिळेल'' अशा काही



मजकुराच्या पाट्या लागल्या होत्या. टूरिंग गाड्यातून जाणारे सुशिक्षित प्रवासी या पाट्या वाचून कोटी करीत की ''उत्तम आइस्क्रीम बरं का! वाटेल त्याला नाही मिळणार. आईला मिळेल आणि तीदेखील उत्तम आई असायला हवी!'' परंतु प्रवाशात पिकणाऱ्या हशामुळे डगमगून जाणारे कच्च्या दिलाचे ते दुकानदार नव्हते. त्यांनी पाटीवरच्या 'अक्षर' वाङ्मयात बिलकूल बदल केला नव्हता. कारण पाटीवरचं शुद्धलेखन कसंही असलं तरी गल्ला भरायचा तो भरतच होता. उन्हाळ्याच्या सीझनमध्ये जाणाऱ्या येणाऱ्या टूरिंग गाड्या या दुकानांपुढे आवर्जून थांबत असत. अशा आडगावी आइस्क्रीमसारखी चैनीची वस्तू मिळाली की प्रवाशांना तिची लज्जत वाढल्यासारखी वाटत असे. आइस्क्रीमचा धंदा चार महिने तेजीत असे... अशा या बाजारपेठेतील गडबड सोडल्यास एकंदरीत हे छोटंसं कणकवली गाव निसर्गाच्या सुंदर कुशीत झोपी गेल्याप्रमाणे दिसत असे...

गावाच्या दक्षिण सीमेला शेतजमिनी नव्हत्या. बाभळीच्या झाडांनी गजबजलेला काहीसा जंगलासारखाच भासणारा प्रदेश होता. बाबासाहेब मोहित्यांची पर्णकुटी या भागात होती. एका बाजूस उंच टेकड्या, दुसऱ्या बाजूस कणकवली गावातली छपरं आणि कौलारं, मुंबई पुणे रस्त्याच्या दुसऱ्या बाजूच्या उतरणीवरची घरं, खाली रेल्वेचं छोटंसं स्टेशन, त्या पलीकडे इंद्रायणी नदीचं पात्र आणि पैलतीरावरच्या विस्तीर्ण खोऱ्याचा भाग असा देखावा पर्णकुटीच्या व्हरांड्यातून दिसत असे...

मल्हार संस्थानच्या सेवेतून निवृत्त झालेल्या, परंतु अजूनही इतिहास संशोधनाचा आपला आवडता उद्योग करणाऱ्या बाबासाहेबांसारख्या माणसानं खरं म्हणजे पुण्यास बंगला बांधून राहावयास हवं होतं. केव्हातरी एकेकाळी त्यांनी मनाशी तसा बेत केलाही होता. परंतु काही निमित्तानं एकदा कणकवली गावात त्यांचा मुक्काम झाला होता. आणि त्या प्रदेशाच्या सृष्टिसौंदर्यानं आकृष्ट झालेल्या त्यांच्या मनानं निश्चय केला होता की, निर्वेध शांतपणानं आयुष्य घालवायला यासारखं दुसरं स्थळ नाही. त्यांच्या पत्नी सीताबाई नेहमी आजारी असत. त्यांच्या दुखण्यावर डॉक्टरी उपाय करून करून बाबासाहेब निराश झाले होते. कणकवलीच्या निर्मळ मोकळ्या हवेत राहिल्यास सीताबाईंना आराम पडेल या विचारानं कणकवलीस छोटा बंगला बांधण्याचा त्यांचा विचार दृढ झाला होता. त्यांनी तो लगेच अमलात आणला होता.

इतर संस्थानांबरोबर मल्हार संस्थान विलीन झालं तेव्हापासून बाबासाहेब या पर्णकुटीत येऊन राहिले होते. इथे राह्यला आल्यापासून सीताबाईंची प्रकृती खरोखरच चांगली सुधारली होती. पुण्याऐवजी या गावी आपण येऊन राहिलो हे फार बरं केलं, असं बाबासाहेबांना वाटू लागलं होतं…

दुर्दैवं एवढंच की त्यांचं हे समाधान दीर्घकाल टिकलं नव्हतं. पाच वर्षांपूर्वी सीताबाईंचा मृत्यू घडला होता. बाबासाहेबांनी या गोष्टीचा फार मोठा धसका घेतला होता. ''शेहेचाळीस वर्ष जिच्या सहवासात राहिलो ती माझी सहचारिणी गेली, आता मला फार एकटेपणा वाटतो'' असे उद्गार ते वारंवार काढू लागले होते. बाबासाहेबांचे तीन मुलगे मोठे झाले होते व आपापल्या उद्योगांच्या निमित्तानं कमी अधिक दूर होते. त्यांची एकुलती एक मुलगी सुनंदा मात्र त्यांच्याजवळ राहिली होती. आईच्या मागे घर सांभाळण्याची आणि बाबासाहेबांची सर्व प्रकारची काळजी घेण्याची जबाबदारी आपली आहे असं तिनं मानलं होतं. पित्याचा प्रेमळपणानं संभाळ करण्याच्या बाबतीत सुनंदानं मात्र त्यांच्याजवळ राहिली होती. आईच्या मागे घर सांभाळण्याची आणि बाबासाहेबांची सर्व प्रकारची काळजी घेण्याची जबाबदारी आपली आहे असं तिनं मानलं होतं. पित्याचा प्रेमळपणानं संभाळ करण्याच्या बाबतीत सुनंदानं कर्तव्यदक्ष प्रेमळ कन्येचा आदर्श निर्माण केला होता. सीताबाईंच्या मृत्यूनंतर विरक्तीचे उद्गार बाबासाहेबांच्या तोंडून वारंवार बाहेर पडत असूनही इतिहास संशोधनाचा आणि लेखनाचा त्यांचा उद्योग चालू राहिला होता. मुद्दाम त्यांना भेटण्यासाठी पुण्या-मुंबईहून येणाऱ्या मित्रांशी व चाहत्यांशी ते पूर्वीच्याच हौसेनं काव्य-शास्त्र-विनोद करीत होते, पर्णकुटीच्या आवारातील फुलझाडांकडे लक्ष ठेवीत होत, तंदुरुस्तीसाठी रोज अर्धा घटका लाकडं फोडण्याचा त्यांचा आवडता छंद कायम होता, एकंदरीत ते उत्साहानं आणि हसत दिनक्रम पार पाडीत होते. याचं श्रेय बहुतांशानं सुनंदाला होतं. वडिलांचं खाणं पिणं, झोप यांकडे तर तिचं लक्ष होतंच, परंतु शिवाय त्यांचा मजकूर लिहून घेणं, त्यांची हस्तलिखितं व्यवस्थित ठेवणं, त्यांच्या ग्रंथसंग्रहाची काळजी घेणं, त्यांचा पत्रव्यवहार वक्तशीरपणानं पार पाडणं, इत्यादी साऱ्या जबाबदाऱ्या संभाळण्याची सुनंदाची चतुराई अशी काही विलक्षण होती की साऱ्या गोष्टी सुसूत्रपणे व्हाव्यात, परंतु त्या कोणी केव्हा केल्या ते लक्षातदेखील येऊ नये. निकटवर्ती मित्रांजवळ सुनंदाची तारीफ करताना बाबासाहेब



कित्येकदा विनोदानं म्हणत, ''लग्नाच्या बायकोला 'वामांग' म्हणतात. सुनंदाची आई मला सोडून गेली तेव्हा डावा हात गेला. परंतु तिच्या पश्चात सुनंदा म्हणजे एक मोठा कर्तबगार आणि प्रेमळ उजवा हात मला लाभला आहे.''

मात्र सुनंदानं लग्न न करता आपल्याकडे राहावं या गोष्टीचा त्यांना मनातल्या मनात खेद वाटत असे. क्वचित प्रसंगी आपला हा खेद ते तिच्याजवळ बोलून दाखवीत असत. त्यांना नक्की माहीत नव्हतं परंतु थोडी शंका होती की सीताबाईंच्या मृत्यूच्या आधी सुनंदा शिक्षणासाठी मुंबईत होती तेव्हा तिचं आणि डॉक्टर अनंत नावाच्या एका तरुणाचं प्रेम जमलेलं होतं. तिनं त्यांना कधी स्पष्ट सांगितलं नव्हतं किंवा विचारलं नव्हतं, परंतु एकदा डॉक्टर अनंतना दोन दिवसांच्या पाहुणचारासाठी तिनं पर्णकुटीवर आणलं होतं, आणि बाबासाहेबांनी व सीताबाईंनी ओळखलं होतं की लवकरच केव्हातरी सुनंदा लग्नासाठी आपली संमती मागणार आहे. पण पुढे सीताबाईंचा मृत्यू झाला होता. सुनंदा पर्णकुटीवर राहू लागली होती. डॉक्टर अनंत कधी आला नव्हता… बाबासाहेब कधी कधी सुनंदाला मोघमपणानं म्हणत, ''माझ्या सुखाचा विचार तू करतेस, तुझ्या सुखाचा विचार तू कसा करीत नाहीस? आणि तू करीत नसशील तर पित्याच्या नात्यानं तो करणं माझं कर्तव्य नाही काय?'' परंतु हा विषय अधिक वाढू नये अशा हेतूनं सुनंदा म्हणे, ''तुमच्याजवळ राहण्यात जे सुख आहे त्याहून माझं काही निराळं सुख आहे ही कल्पनाच डोक्यातून काढून टाका पाहू.'' मग बाबासाहेब तो विषय सोडून देत…

मनाशी मात्र ते आश्चर्य करीत की सुनंदानचं आणि डॉक्टर अनंतचं अजूनही प्रेम आहे की नाही, आणि असेल तर त्या दोघांनी विवाहबद्ध व्हावं म्हणून आपल्याला आग्रह करता येणं शक्य आहे की नाही?… मधूनच सुनंदाला डॉक्टरांचं एखादं पत्र येत असे. सारीच पत्रं उघडून पाहण्याचं काम सुनंदा करीत असे. ती आपण होऊन बाबासाहेबांना सांगे, ''आज डॉक्टरांचं पत्र आलंय.'' ''काय म्हणतात डॉक्टर?'' असं विचारताना बाबासाहेब लेकीची चर्या मुद्दाम न्याहाळून बघत असत. डॉक्टरांच्या पत्रातला मजकूर वाचून भावना कितपत चाळविल्या गेल्या आहेत त्याचा अदमास त्यांना घ्यायचा असे. परंतु ''काही विशेष नाही लिहिलेलं डॉक्टरांनी. खुशाल खुशाल, प्रॅक्टीस जोरात चालली आहे. इतकंच-'' असं सांगताना सुनंदाची चर्या अगदी निर्विकार असे… एखादे वेळी बाबासाहेबांनी म्हणावं, ''इकडे चार दिवस